"नॉर्थ कॅनरा जी. एस्. बी. वृत्तविलास"
दि नॉर्थ कॅनरा गौड सारस्वत ब्राह्मण संघाची त्रैमासिक

# मुखपत्रिका

कार्यालय फोन : २३८७७३०१, २३८८००७३
**WEB SITE : http://www.nkgsbsangh.org**
**E-MAIL : nkgsbs@gmail.com**
कार्यालयीन वेळ : दुपारी ३ ते ७ (शनिवारी ३ ते ५)

।। वादे वादे जायते तत्त्वबोधः ।।

परस्परम् भावयन्तः श्रेयः परमवाप्स्यथ

मूल्य रु. ५

| | | |
|---|---|---|
| क्रमांक २ | वर्ष : ३६ | जुलै-सप्टेंबर २०१४ |

**BOOK PACKET (PERIODICAL)**
Regd. with Registrar of Newspaper of India, Reg. No. RN37436/80

**TO,**

**From :** The NKGSB Sangh, Laxmi Sadan, 361, V.P. Road, Mumbai - 400 004.

## ठाणे मंच

### ठाणे मंच सादर करीत आहे

# ‘आमगेलेच डॉक्टर्स - आमगेल्याच वासपुशीक’

### डॉ. श्रीधर सुधाकर कुलकर्णी, एम्.एस्.(ऑर्थो)

### यांच्या मार्गदर्शनाखाली एक घरगुती मेळावा

आपल्याशी संवाद साधण्यासाठी येत आहेत

- डॉ. सिध्दार्थ शिवानंद वागळे, बी.डी. एस., डेन्टल सर्जन
- डॉ. नन्दिता प्रफुल्ल पालेकर, एम्. एस्. (ई.एन्.टी), कान, नाक, घसा तज्ज्ञ

**स्थळ** : क्रीडा संकुल, सरस्वती स्कूल (मराठी), मल्हार टॉकीज समोर, ठाणे (प)

**तारीख, वेळ** : रविवार २१ सप्टेंबर, सकाळी १० ते १

कार्यक्रमानंतर पोटभर नाश्ता आयोजित आहे. आपली उपस्थिती अगोदर कळविल्यास आम्ही अधिक अगत्याने आपले स्वागत करू शकू.

**सुरेश पालेकर : ९९६९४५५३७०** **मंजिरी कुलकर्णी : ९६६५०९८११७**

# विवाहाचे सुवर्ण वर्ष गाठणाऱ्या जोडप्यांचा व ७५ वयोमर्यादा ओलांडणाऱ्या व्यक्तींचा संघातर्फे सत्कार

नेहमीच्या प्रथेनुसार यंदाही २३ नोव्हेंबर रोजी होणाऱ्या ज्ञातीच्या स्नेहसंमेलनात २०१४ ह्या वर्षात विवाहाचे सुवर्ण वर्ष गाठणाऱ्या जोडप्यांना व ७५ वयोमर्यादा ओलांडणाऱ्या व्यक्तींना ज्ञातीतर्फे स्मृतिचिन्हे देऊन त्यांचा सत्कार करण्यात येईल. संबंधित व्यक्तींनी किंवा त्यांच्या आप्तेष्टांनी त्यांची संपूर्ण नावे, पत्ता व टेलिफोन नंबर ३० सप्टेंबर २०१४ पर्यंत संघाच्या पत्त्यावर पाठवून किंवा टेलिफोनवर कळवून आम्हांस उपकृत करावे.

१ ऑक्टोबर नंतर अशी नावे आल्यास ऐनवेळी ही स्मृतिचिन्हे तयार करणे कठीण जाते याची कृपया दखल घ्यावी.

## हळदीकुंकू समारंभ : भगिनींस आमंत्रण

नेहमीचा श्रावणातला हळदीकुंकू समारंभ यंदा जोगेश्वरी व मुलुंड येथे योजिला आहे. आपण हेच निमंत्रण समजून वेळात वेळ काढून आपल्या लेकीसुनांसह सोयीस्कर ठिकाणी अवश्य उपस्थित राहावे.

| | जोगेश्वरी | मुलुंड (प) |
|---|---|---|
| **तारीख** | : शुक्रवार १५ ऑगस्ट | शुक्रवार ८ ऑगस्ट |
| **स्थळ** | : रामेश्वर मंदीर<br>सरस्वती बाग, जोगेश्वरी (पू) | सौ. वृंदा दिवेकर (२५६१६५२७)<br>श्री. गुरुकृपा, भोजराज रोड, मुलुंड (प) |
| **वेळ** | : संध्याकाळी ५ ते ७<br>**संघ कार्यकारिणी तर्फे**<br>सौ. जयश्री भेडसगांवकर<br>सौ. शांता पालेकर | संध्याकाळी ५ ते ७<br>**ठाणे मंच कार्यकारिणी तर्फे**<br>सौ. वृंदा दिवेकर<br>श्रीमती मंजिरी कुलकर्णी |

# संपादकीय

### सारस्वत विद्यार्थी साहाय्यक मंडळी विद्यार्थी वसतिगृह - बोरीवली

सारस्वत विद्यार्थी साहाय्यक मंडळी, गिरगांव, मुंबई ही ११० वर्षापूर्वी स्थापन झालेली एक सामाजिक संस्था आहे. संस्थेतर्फे गौड सारस्वत ब्राह्मण ज्ञातीतील (पोटभेदाकडे लक्ष न देता) गरजू व होतकरु विद्यार्थ्यांना प्राथमिक, माध्यमिक व उच्च शिक्षणासाठी शिष्यवृत्तीच्या माध्यमातून आर्थिक साहाय्य दिले जाते. या संस्थेची उद्दिष्टे आपल्या एज्युकेशन सोसायटीच्या उद्दिष्टांशी मिळतीजुळती आहेत. विशेष म्हणजे संस्थेतर्फे बोरीवली येथे बळवंत माडगांवकर विद्यार्थी वसतिगृह चालविण्यांत येते. पन्नास साठ वर्षापूर्वी आपली कुटुंबे आपापल्या गांवीच राहत होती व विद्यार्थी मुलांना कॉलेज शिक्षणासाठी मुंबईत जावे लागे. अशावेळी या विद्यार्थ्यांना हे वसतिगृह म्हणजे गरज होती. कालांतराने बहुतेक कुटुंबाचे मुंबईपुण्यासारख्या शहरांत स्थलांतर झाले व मुलांना वसतिगृहाची गरज भासेनासी झाली. त्याचप्रमाणे गावोगावी महाविद्यालयांची स्थापना झाल्याने वसतिगृहातील विद्यार्थ्यांच्या संख्येत घट झाली. तरीही संस्थेने हे वसतिगृह बंद केलेले नाही.

आपल्या ज्ञातीतील विद्यार्थ्यांना वसतिगृहात राहण्याची गरज भासली तर बोरीवली येथील हे वसतिगृह उपलब्ध आहे याची संबधितांना माहिती असावी या हेतूने वरील तपशील दिलेला आहे. इच्छुकांनी संस्थेशी थेट संपर्क साधवा. (२३८६९१६७).

**पत्ता : सारस्वत विद्यार्थी साहाय्यक मंडळी, चिकित्सक समुह भवन,**
**खाडिलकर रोड, गिरगांव, मुंबई - ४००० ००४.**

१ जुलै २०१४

द. ना. नाडकर्णी

# एज्युकेशन सोसायटी : गुणवत्ताधारक विद्यार्थ्यांस बक्षिसे

दरवर्षी ज्ञातीच्या स्नेहसंमेलनांत ज्ञातीतील गुणवंत विद्यार्थ्यांना उत्तेजन देण्यासाठी बक्षिसे दिली जातात. त्यानुसार यंदाही २३ नोव्हेंबर २०१४ रोजी भरणाऱ्या स्नेहसंमेलनांत बक्षिसे दिली जातील. बक्षिसांची पात्रता पुढील प्रमाणे :

| परीक्षा | | किमान पात्रता |
|---|---|---|
| दहावी | | ८०% |
| बारावी – | विज्ञान (वैद्यकीय महाविद्यालयांत प्रवेश घेतला असेल तर अर्जात तसे नमूद करावे.) | ७५% |
| | वाणिज्य | ७०% |
| | कला | ६५% |
| पदवी व सरकारमान्य डिप्लोमा | | ६०% |
| एम.ए., एम.कॉम, एम.एस्सी. पीएच.डी, वैद्यकीय क्षेत्रातील पदवी एम.बी.ए., सी.ए., कॉस्ट अकौंटस, कंपनी सेक्रेटरी, पदव्युत्तर डिप्लोमा इत्यादी, | | उत्तीर्ण |
| परदेशांत घेतलेली पदवी | | ए ग्रेड |

तसेच किमान राज्य पातळीवरील क्रीडास्पर्धेत ज्यांना पदके मिळाली असतील किंवा जे स्कॉलरशिप परीक्षेत गुणवत्ता यादीत उत्तीर्ण झाले असतील तर संबंधितांनी त्याचाही तपशील पाठवावा. कार्यकारिणी अशाही अर्जांचा विचार करील.

**अर्ज स्वीकारण्याची शेवटची तारीख १ ऑक्टोबर २०१४**

विद्यार्थ्यांनी गुणवत्ता पत्रिकेची प्रत (झेरॉक्स), टेलीफोन नंबर व संपूर्ण पत्ता. The NKGSB Ind & Education Society, Laxmi Sadan, 361, V.P. Road, Mumbai 400004. या पत्त्यावर पाठविण्याची कृपा करावी.

- ☐ विद्यार्थ्याच्या वडिलांचे मूळ गांव उत्तर कानडांत असावे व ते स्मार्त कवळे मठानुयायी असावेत किंवा आई माहेरच्या तिथल्या असून सारस्वत पोटजातीतील गृहस्थाशी विवाहबद्ध असल्या पाहिजेत.
- ☐ बारावी उत्तीर्ण झालेल्या विद्यार्थ्यांनी एम.बी.बी.एस., जर्नेलिझम किंवा बी.कॉम. शाखेत प्रवेश घेतल्यास तसे नमूद करावे.
- ☐ ज्या डॉक्टर्सनी एम्.एस्. किंवा एम्.डी. साठी प्रवेश घेतला आहे, त्यांनाही काही पुरस्कृत बक्षिसे आहेत. संबंधितांनी याचा लाभ घेण्यासाठी अर्ज करावा.

# प्रकाशझोत

## डॉ. संगीता पिकळे यांची असोसिएशन ऑफ मेडिकल कन्सल्टंट्स या संस्थेच्या अध्यक्षपदी निवड

मुंबईमध्ये असोसिएशन ऑफ मेडिकल कन्सल्टंट्स (A.M.C.) ही तज्ज्ञ डॉक्टरांची एक संघटना आहे. माहीम येथील डॉ. संगीता हेमंत पिकळे यांची अलीकडेच या संघटनेच्या अध्यक्षपदी निवड झाली. वैद्यकीय क्षेत्रात हे पद अत्यंत प्रतिष्ठेचे समजले जाते. एप्रिलपासून त्यांनी अध्यक्षपदाची सूत्रे हाती घेतली आहेत. ज्याप्रमाणे इंडियन मेडिकल असोसिएशन ही संघटना प्रामुख्याने पदवीधर डॉक्टरांच्या हितसंबंधाची दखल घेते त्याचप्रमाणे पदव्युत्तर तज्ज्ञ डॉक्टर्स व त्यांच्या नर्सिंग होम्स यांच्या अडीअडचणीवर मात करण्यांसाठी व त्यांचे हितसंबंध राखण्यासाठी A.M.C. ची स्थापना झाली. आज मुंबईतील सुमारे सात हजार तज्ज्ञ व बहुतेक नर्सिंग होम्स त्यांत सामील आहेत. नवनवीन जाचक कायद्यामुळे दोघांच्याही अडचणी वाढल्या आहेत व दुसऱ्या बाजूला रुग्णसेवेचा खर्च अवाढव्य वाढल्यामुळे जनतेचा वैद्यक व्यवसायावरचा विश्वास उडत चालला आहे. त्यामुळे अध्यक्षपदाची जबाबदारी स्वीकारणे म्हणजे एक तारेवरची कसरत आहे. एका बाजूला रुग्णसेवेत येणाऱ्या अडचणी दूर करण्याकरिता सरकार दरबारी प्रयत्न करीत असतांनाच सर्वसामान्य जनतेला प्रामाणिक व दर्जेदार सेवा कशी देता येईल यासाठीही प्रयत्न करणे हे अध्यक्ष या नात्यांने सेवा म्हणून काम करण्याचा डॉ. पिकळे यांचा मानस आहे.

या संघटनेमध्ये त्या गेली कित्येक वर्षे कार्यरत आहेत. खजिनदार, सहचिटणीस वगैरे पदांवर त्यांनी काम केलेलेच आहे. त्यांचा स्पष्टवक्तेपणा व धडाडी पाहूनच यंदा सभासदांनी त्यांची अध्यक्षपदी निवड केली. नवोदित डॉक्टर्सना प्रत्यक्ष व्यवहारांत लागणाऱ्या अनेक विषयांचे ज्ञान त्यांना वैद्यकीय शिक्षणक्रमात मिळत नाही. उदाहरणार्थ वैद्यकीय क्षेत्राला लागू पडणारे कायदे (२१ हून अधिक), अर्थकारण, संभाषण कौशल्य, प्रशासन इत्यादी. त्याकरिता मे महिन्यांत लोकमान्य टिळक महाविद्यालय (सायन हॉस्पिटल) येथे त्यांनी एक दिवसाचे शिबीर घेतले व तेथील चारशे नवोदितांनी त्याचा लाभ घेतला. असेच कार्यक्रम नायर व के. ई.एम्. रुग्णालयांतही घेण्यांचा त्यांचा मानस आहे. तसेच आरोग्यविषयाची भरपाई करतांना विमा कंपन्या त्यांत विनाकरण काटछाट करतात. त्याविरुध्दही आघाडी उघडून कोर्टांत जनहित याचिका दाखल करण्यास मदत करुन संबंधितांची ही अडचण दूर करणाच्या त्या प्रयत्नांत आहेत व ती सुटण्याच्या मार्गावर आहे.

डॉ संगीता पिकळे लो. टिळक महाविद्यालयांतून एम.बी.बी.एस. झाल्या व के.ई.एम. मधून त्यांनी स्त्रीरोग व प्रसूती शास्त्र या विषयात पदव्यूतर शिक्षण पूर्ण केले (MD, Ob-Gyn). त्यांचे पती डॉ. हेमंत पिकळे हे MS Ped. Surgeon आहेत. माहीम येथील या डॉक्टर द्वयींच्याच पिकळे हॉस्पिटलमध्ये

२२ वर्षे त्या प्रॅक्टिस करताहेत. 'अवघड प्रसूती' यात त्यांचे विशेष प्रावीण्य आहे.

सायन हॉस्पिटलचे निवृत्त डीन डॉ. सदानंद नाडकर्णी यांची संगीता ही कन्या व प्रसिध्द समाजसेवक कै. एस्. व्ही. पिकळे यांची सून. त्यांना त्यांच्या कार्यात सुशय लाभो व त्यायोगे मध्यमवर्गीयांना चांगली आरोग्यसेवा वाजवी खर्चात उपलब्ध होवो याकरिता संघातर्फे त्यांना हार्दिक शुभेच्छा.

## ठाणे मंच वधूवर सूचकमंडळ माहीम व मुलुंड शाखा

यापुढे माहीम व मुलुंड शाखांचे काम खालील भगिनी बघतील

**माहीम** : सौ. अनन्या अनिल नाडकर्णी व सौ. माधवी उल्हास सबनीस
७०२, शिवाना सोसायटी, टेलिफोन कॉलनी समोर, मोगल लेन, माहीम
फोन : २४३६६७०० / ९८६७०४९३५७ / ९८२१५७९५४२

**मुलुंड** : श्रीमती सुषमा सुबोध मुळगांवकर (सौ. लता पिकळे यांच्या ऐवजी)
२०१ बी, अम्बिका प्लाझा, ९० फूट रोड, मुलुंड (पू)
फोन २५६३४८५० / ९८१९८३६४७६

**उभय ठिकाणी : वेळ : गुरुवार, संध्याकाळी ४ ते ६**


MIPL

MANGSIDHESH INVESTMENT PVT. LTD.

Financial Advisors | Equity Trading | Public
Mutual Funds | RBI Bonds | LIC, Mediclaim
Postal Schemes

**Corporate Office**

Bldg. No. 1, Flat No. 1A, Saraswati Baug, HFS Road, Jogeshwari (E), Mumbai - 400 060.
Tel.: 2836 2057 / 2824 5298 / 6457 1272 - 85

## मुंबई व ठाणे मंचचा संयुक्त, सांस्कृतिक धमाल कार्यक्रम 'धूमशान'

या वर्षीचा १० मे २०१४ रोजी ठाणे मंच व मुंबई मंच यांनी एकत्र येऊन सादर केलेला 'कर्नाटक संघ, माटुंगा' येथील 'धूमशान' हा सांस्कृतिक कार्यक्रम म्हणजे एक 'गोड कौतुक सोहळा' असे म्हणता येईल.

आपल्या संघाचे अध्यक्ष श्री. प्रेमानंद नाडकर्णी यांनी सर्वप्रथम आपल्या कुलदैवतांना वंदन करुन आशीर्वाद घेतले. सौ. चित्रा कामत यांनी सर्व मान्यवरांचे व रसिक प्रेक्षकांचे स्वागत केले. ह्याच रंगमंचावर शेवटचा श्वास घेतलेले मुंबई मंचचे उपाध्यक्ष, उत्साही व हरहुन्नरी कलावंत कै. संजय नाडकर्णी यांची सर्वांनाच आठवण आली. दोन मिनिटे शांतता पाळून त्यांना श्रध्दांजली वाहण्यात आली. प्रमुख अतिथी श्री. गणेश पंडीत तसेच संस्थेचे पदाधिकारी यांनी दीपप्रज्वलन केले. सौ. विद्या (माधुरी) वागळे यांनी श्री. पंडीत यांची ओळख करुन दिली. राष्ट्रपती पदक विजेत्या 'यलो' तसेच गाजलेल्या 'बालक-पालक' या चित्रपटांच्या कथा, संवाद तसेच पटकथा त्यांनी लिहिल्या आहेत. तसेच हल्ली चालू असलेल्या 'हलकं फुलकं' या नाटकाचे दिग्दर्शक ही तेच आहेत. आपल्या साधेपणाने केलेल्या छोटेखानी भाषणाने श्री. गणेश पंडीत यांनी सर्व प्रेक्षकांची मने जिंकली.

कार्यक्रमाची सुरुवात कु. समीक्षा पालेकर हिच्या 'गणेश वंदना' ह्या अतिशय सुरेख नृत्याने झाली. त्यानंतर झाला एकापेक्षा एक अशा बहारदार लावण्यांचा नृत्याविष्कार! जणू काही स्वर्गाच्या अप्सरा भूलोकी अवतरल्या की काय असे वाटत होते. प्रेक्षकांनीही शिट्या व टाळ्यांच्या गजरात त्यांना मस्त दाद दिली. डोईवर फेटे नव्हते नाहीतर ..... सौ. रसिका गायतोंडे हिने आपली सर्व व्यवधाने सांभाळून सर्व सहकलाकारांकडून अतिशय कमी वेळात उत्कृष्ट लावण्या बसवून घेतल्या. ठाण्याच्या सौ. मिथिला गायतोंडे यांनी दोन लावण्या स्वत: बसवून ठसक्यात सादर करुन त्यांना छान साथ केली.

त्यानंतर खास पुण्याहून आलेली कु. सौम्या बोरकर हिने 'ओडिसी' हा शास्त्रीय नृत्यप्रकार अप्रतिमपणे सादर केला. तिचे नृत्यकौशल्य पाहून सर्व प्रेक्षक मंत्रमुग्ध झाले.

त्यांनतर झाली ALL IS WELL ही धमाल विनोदी नाटुकली! ठाण्याच्या पन्नाशीच्या पुढच्या महिलांनी अगदी मनापासून या नाटिकेत काम करुन मस्त enjoy केले व पदार्पणातच सिक्सर मारली. सर्व प्रेक्षकांनीही मनापासून कौतूक केले. काही भगिनीनी आमच्या पुढच्या नाटिकेत काम करायची इच्छा व्यक्त केली. या स्त्रीप्रधान नाटिकेत दोघा पुरुषांनीही फोनवरुन मस्त संभाषण करुन रंगत आणली. या खुसखुशीत नाटुकलीचे लेखन व दिग्दर्शन केले होते सौ. मिथिला गायतोंडे यांनी.

मध्यंतरांत चहा-बिस्किटे व गप्पागोष्टींचा कार्यक्रम झाल्यावर सौ. चित्रा कामत यांनी आभार प्रदर्शनाचे भाषण केले.

आता आहे लग्नाचा मोसम, त्यात हल्ली 'संगीत' मस्ट झाले आहे. तर हीच थीम घेऊन सौ. सुचेता सोहोनी व त्यांच्या सहकलाकार यांनी अशाच लग्नाच्या गाण्यावर छान छान नृत्ये सादर केली. खरोखरच वय विसरायला लावणारी अशी ही नृत्ये होती. लग्नानंतरचा 'गोंधळ' ठाण्याच्या बायकांनी जोशात सादर केला.

कु. समीक्षा पालेकर व कु श्रीदा फेणे या दोन अतिशय गोड मुलीनी असे काही थिरकत, गिरक्या घेत गरबा नृत्य सादर केले की डोळ्यांचे पारणे फिटले! वाटत होते की स्टेजवर बाहुल्याच नाचत आहेत. प्रेक्षकांनीही Once More चा जल्लोष केला.

सर्वात शेवटी last but not least म्हणतात तसा Fashion Show! या शो मधील एकही कलाकार व्यावसायिक नसतानाही प्रत्येकाने मस्त attitude दाखवत दिमाखदारपणे आपली Fashion पेश केली. प्रेक्षकांनीही कौतुकाची दाद दिली. सौ. रसिका गायतोंडेने अतिशय सुविहित असा हा शो ९ पुरुष व ९ महिला यांच्याकडून बसवून घेतला.

अलीकडेच डॉ. मोहन आगाशे मुलाखतीत म्हणाले, कलाकारच कलाकार म्हणून जन्माला येतो असे नव्हे तर प्रत्येक मनुष्यच कलाकार म्हणुनच जन्म घेतो. पुढे परिस्थिती, प्रोत्साहन, आवड, जिद्द, मेहनत इत्यादी अनेक गोष्टीनी तो घडत जातो. याचीच आज छान प्रचिती आली. अगदी १० वर्षापासून ते ७० व्या वर्षापर्यंतच्या कलाकारांनी आपली कला उत्कृष्टपणे सादर करण्याचा प्रयत्न केला. अर्थात जागेअभावी सर्वांची नावे देता येत नाहीत, क्षमस्व!

पूर्ण कार्यक्रमाच्या सूत्रसंचालनाची जबाबदारी सौ. चित्रा कामत, सौ. विद्या वागळे, सौ. स्वाती तेलंग व सौ. सुचेता सोहोनी यानी यशस्वीपणे सांभाळली. कार्यक्रमाची सांगता राष्ट्रगीताने झाली.

डॉ. आगाशेजींच्या प्रमाणे मी असे म्हणेन की, प्रत्येक माणूस हा रसिक म्हणुनच जन्माला येतो. योग्य वेळी योग्य प्रकारे दाद देणे ही सुध्दा एक कलाच आहे. आजच्या भरभरुन प्रतिसाद देण्याऱ्या रसिक प्रेक्षकांना मुंबई मंच-ठाणे मंचचा मानाचा मुजरा!

**मंजिरी मनोज कुलकर्णी, ठाणे**


**WANTED A PART TIME OFFICE ASSISTANT**

For : The NKGSB Sangh, Laxmi Sadan, 361, V. P. Road, Mumbai - 400 004.

**Qualifications :** Basic Computer Operating Knowledge,

Applications with Bio-Data to reach the Secretary before the end of August 2014.

# याला जीवन ऐसे नांव

अमेरिकेहून प्रसिध्द होणारे 'रीडर्स डायजेस्ट' हे मासिक सर्वांना सुपरिचितच आहे. त्या मासिकांत नियमितपणे 'Life is like that' हे लोकप्रिय सदर प्रसिध्द होते. त्याच्या लोकप्रियतेचे प्रमुख कारण म्हणजे त्यांत नमूद केलेले विनोदी किस्से हे सत्यघटनेवर आधारित असतात व ते मनाला निखळ आनंद देतात. मराठी भाषेतले पहिले डायजेस्ट म्हणजे 'अमृत' व त्याचे पहिले संपादक होते सुप्रसिध्द कारवारी साहित्यिक नाशिकचे डॉ. अ. वा. वर्टी. 'अमृत' मध्ये वर नमूद केल्यासारखे जे सदर प्रसिध्द होते त्याचे डॉ. वर्टी यांनी 'याला जीवन ऐसे नांव' हे शीर्षक दिले होते. त्या अनुषंगाने सत्यघटनेवर मला जे काही विनोदी प्रसंग अनुभवावयास मिळाले ते इतरांच्या मनोरंजनासाठी लिहिण्याचा हा प्रयत्न. त्यांतील घटना सत्य असल्या तरी व्यक्तींची नांवे काल्पनिक आहेत.

## घरचा डॉक्टर

पुण्यात सारस्वत कॉलनीत राहत असताना एकदा माझी आई, माझी बहीण शांता हिला घेऊन डॉ. कामत यांच्या घरी हळदीकुंकू समारंभाला गेली होती. शांता ही त्यावेळी शाळकरी मुलगी होती व साधी व सरळ मनाची तशीच बोलकीपण. 'डॉ. कामत' ही बाहेरच्या दरवाजावरची पाटी शांताने पाहिली होती. पण नांवापुढे लिहिलेल्या डिगऱ्या मात्र तिला समजल्या नाहीत. हळदीकुंकवाचे वाटप चालु असतांना जमलेल्या कारवारी महिला, अनेक गोष्टींवर चर्चा करीत होत्या. कोणीतरी एका बाईने 'हल्ली वकदां खूब म्हारग जाल्यांत तांतून आणि डॉक्टराली गलेलठ्ठ फी' असे वैद्यकीय उपचारासंबंधी उद्‌गार काढले. त्यावर शांता यजमानबाई सौ. कामत यांना उद्देशून ऐकूं जाईल असे मोठयाने म्हणाली, 'तुम्का बरें आसा घरचोच डॉक्टर' हे उद्‌गार ऐकून कांही बायका गालातल्या गालात हसू लागल्या. आईने मात्र शांताला जवळ घेऊन दटावून बारीक आवाजात सांगितले, 'अगॉ, गप्प बस. तो डॉक्टर मनशालॉ ना, गुरांचो आसा' पण सौ. कामतही हुशार व खिलाडु वृत्तीच्या होत्या. त्याही शांताला हसत म्हणाल्या, 'हे पळय शांता तूं जेन्ना शीक पडतले तेन्ना हाव तांका तुका ट्रीटमेन्ट दिवच्याक धाडता.' हे ऐकून उपस्थितांमध्ये एकदम मोठा हशा पिकला.

## मला पण आवळा!

पुण्यात एका नातेवाईकाच्या लग्नाच्या वेळी जमलेली कांही कारवारी मंडळी बनेश्वर येथे एक दिवस एकत्र जमून धमाल करण्यासाठी सहलीला गेली होती. कोंकणी व मराठी या दोन्ही भाषांचा वापर करीत सर्वजण हास्य विनोदांत व आजुबाजूला हिंडण्यात मग्न झाली होती. आमच्यातला वामन हा अति उत्साही व धडपड्या पण तसाच हजरजबाबी व वात्रट, संधी मिळण्याचा अवकाश, प्रासंगिक विनोद करुन तो हास्याची कारंजी उडवत असे. त्याचा सहवास म्हणजे मनोरंजनच असे.

सहलीच्या वेळी कोठूनतरी सभोवतालच्या बागेतून त्यांने तिखट मीठ लावलेले चटकदार आंवळे आणले व तो ते जमलेल्या मंडळीत वाटू लागला साहजिकच त्याच्या भोवती आवळे घेण्यासाठी एकच झुंबड उठली. वामन जरी कारवारी तरी त्याची पत्नी उमा ही पुण्याची मराठी. दुरून उमापण धावतच वामनकडे आली आणि त्याला उद्देशून मोठयाने म्हणाली, 'अहो, मला पण आवळा' पण ती वाक्य पूर्ण करण्यापूर्वीच वामन तिला अर्थाचा अनर्थ करीत म्हणाला, 'छे, इतक्या सर्वांच्या देखत तुला मी आवळू ? ते सर्व काही घरी, इथे नाही.'

अर्थातच सर्वत्र एकच प्रचंड हशा उसळला. उमाने त्याच्या पाठीवर चपराक मारुन 'फाजील कुठले' म्हणत पळ काढला. ती नंतर समोर आलीच नाही. घरी जाईपर्यंत तिला सर्वांनी भंडावून सोडले.

## शेरास सव्वा शेर

मी कॉलेजमध्ये शिकत असतांनाची घटना. फिजिक्सचे प्रा. जोग मॅग्नेटिझमवरती धडा घेत असतांना 'अपवादाने नियम सिध्द होतो' हा एक सिध्दान्त आम्हां विद्यार्थ्यांच्या पचनी पडावे म्हणून घोळवून घोळवून समजून सांगण्याचा प्रयत्न करीत होते. पिरीयड जसा संपला तसा दुपारची वेळ असल्याने आमचा मित्रगट म्हणजे मी वागळे (सारस्वत), जोशी (कोब्रा), शहा (जैन) व पुंगलिया( मारवाडी) असे आम्ही चौघाजणांनी बटाटवडा व चहा घेण्यासाठी नेहमीप्रमाणे कॉलेज कँटीनकडे धाव घेतली.

कॉलेज जीवनात मित्रमंडळीमध्ये एकमेकांची थट्टा करणे अथवा खेचणे हा एक आवडीचा नित्यक्रमच असायचा. तास नुकताच संपला असल्याकारणाने जोशी डोळे मिचकवत विचारता झाला, 'अपवादाने नियम सिध्द होतो हे कोणाला कळले का ?' मारवाडी पुंगलिया हा वात्रटच. संधी मिळाल्यास कोणाची थट्टा करण्यात पटाईत, माझ्याकडे वळून हसतच म्हणाला हा बघ वागळे कारवारी सारस्वत व ह्याची जमात अतिशय बुध्दीमान म्हणून प्रसिध्द पण हा कसा मठ्ठ हे आपल्या सर्वांना माहितच आहे. म्हणजे ज्ञातीतला अपवादच. आतां कळले ना तुम्हाला की अपवादाने कसा नियम सिध्द होतो.

अर्थातच सगळे मान डोलावत हसले पण माझा चेहरा मात्र साफ पडला. पण का कुणास ठाऊक माझे मूळचे सारस्वती तल्लख डोके एकदम जागे झाले. उत्तरादाखल जोशीकडे वळून म्हणालो 'जोश्या, मी तुला आणखी एक चांगले उदाहरण देऊन हा नियम जास्त चांगल्या तऱ्हेने सांगतो. हा पुंग्या (पुंगलिया) लेकाचा मारवाडी आणि ह्याची जमात अत्यंत कंजुष म्हणून कुप्रसिध्द पण हा तसा नाही बरं का ? एकदम अपवाद, म्हणजे कमालीचा उदार. आपल्या सर्वांच्या खाण्याचा खर्च तो आपणहून हा नियम पटवून दाखविण्यासाठी निश्चित करणार!' सगळयांनी अर्थातच माझ्या म्हणण्याला जोरदार पाठिंबा देत माझी बाजू उचलून धरली हे सांगावयास नको. बाजू अंगावर उलटल्याने पुंगलियाचा चेहरा साफ पडला आणि

शब्द मागे घेत व मला हात जोडीत म्हणाला, 'मानले तुला तू अपवाद नाहीस हे सिध्द केले तसे मीही अपवाद नाही हे मला सिध्द करु दे. खाण्याचा खर्च नेहमीप्रमाणे आपापला करावा' पण सर्वांचा खर्च त्याने करण्यास आम्ही त्याला भाग पाडले. त्याने केलेली थट्टा त्याच्याच अंगाशी आली.

**शंकर मं. वागळे, वांद्रे (९८३३३६०६९९)**


।। कै. दत्तात्रय वै. पालेकर (पोटली दत्ता), अमृतवाडी
यांचे कृतज्ञतापूर्वक पुण्यस्मरण ।।

**PRACHI FOODS & CATERING SERVICES**
**OF PRAKASH GUDE**

- All types of Delicious Food • Pickles & Papad
- Poojari Available for Devkritya & Dharmakritya
- Our Home Made Goan Speciality-Tikhase Phov / Churma
- Dry Fish - Suke Bangde, Mori & Sungta

A - 305, Best Swasadan, Liliya Nagar, Near Kamat Club,
Goregaon (West), Mumbai - 400 062. ( 9869423494/28744683 )

LIC
भारतीय जीवन बीमा निगम
LIFE INSURANCE CORPORATION OF INDIA

*Sanjay K. Telang*
***Insurance Consultant***

Office : Br. No. 89F, Satelite Classic, 1st Floor, Caves Road,
Jogeshwari (East), Mumbai - 400 060.
Mob. : 98331 55349 Email : sanjaytelang@ymail.com

**SHREE HOMOEOPATHIC PHARMACY**
**Wholesale & Retail For :**
**Genuine India & Imported Homoeopathic Medicines**

Laxmi Ratan Co-op. Hsg., Shop No. 6, Opp. Karnataka Sangh Hall, Mogal Lane,
Matunga (West), Mumbai - 400 016. Tel. : 2438 3092 / 2430 9035 Mob. : 98694 83433
Time : 9.00 a.m. to 8.00 p.m. **(SUNDAY CLOSED)**

**Mrs. Nandita D. Wagle, Dr. Divya D. Wagle (BHMS. Bom.) , Dr. Dilip M. Wagle (LCEH. Bom.)**

www.kccgoa.in

# वीण विश्वासाची, सोबत निसर्गाच्या कुशीची

कुणाल कन्स्ट्रक्शन म्हणजे उत्तम बांधकाम, कल्पक वास्तुशास्त्र आणि सर्वोत्तम सुविधांची विश्वासार्हता. विश्वासाच्या याच विणीतून साकारलेल्या **गोव्यातील 'सुखसमृद्धी' संकूलात** आजच तुमची वास्तू पक्की करा आणि मग अनुभवा निसर्गाच्या कुशीत नटलेलं तुमचं समृद्ध संपन्न आयुष्य.

प्रदूषणविरहीत अशा वातावरणात राहून तुम्हाला अधिक संपन्न असं मानसिक आणि शारीरिक दीर्घायुष्य अनुभवता येईल यात काही शंकाच नाही.

सोबत मंगेश, म्हाळसा, नृसिंह, नवदुर्गा अशा देव-देवतांच्या सान्निध्याने पवित्र झालेला परिसर दीर्घायुष्याचं वरदान ठरेल हे नक्कीच.



**सुखसमृद्धी**

मंगेशाच्या देवळापासून 2 मिनिटांच्या अंतरावर, **मंगेशी, फोंडा- गोवा**

**देखणा निसर्ग | प्रदूषणमुक्त हवा | उत्कृष्ट बांधकाम | मुबलक पाणीपुरवठा**

मंगेशीचा **मंगेश**, म्हार्दोळची **म्हाळसा** वेलिंगचा **नृसिंह**, मडकईची **नवदुर्गा** अशा अतिशय प्रसिद्ध मंदिरांच्या सान्निध्याने पवित्र झालेला परिसर.



**फ्लॅटस् उपलब्ध:** 1 रूम किचन, 1 बी.एच्.के, 2 बी.एच्.के
**प्रोजेक्ट मान्यता:** गोवा टाउन प्लॅनिंग
**कर्जसहाय्य:** नामवंत वित्त संस्था

a Project by: KCC **कुणाल कन्स्ट्रक्शन कंपनी**

**मुंबई ऑफिस:** श्री. उमेश केरकर, 401, चौथा मजला, व्योम आर्केड, युनायटेड इंक कंपनीच्या बाजूला, सुभाष रोड, विलेपार्ले (पू), मुंबई- 400057. टेलि: **2683 3841/47/ 72.** मोबा: **98336 36451**
फॅक्स: 2683 3872 ई-मेल: kunalconstruction@vsnl.net, kunalconstructiongoa@yahoo.in

गोवा ऑफिस: टी- 1, रॉयल हाऊस, काझीवाडो, फोंडा- गोवा. मोबा: **98209 33352, 98206 33321**

गोवा साईट: **95/1**, वेलिंग, मंगेशी, म्हार्दोळ, फोंडा- गोवा

## देवाई

देव माझा मांगिरीश आई माझी शांतादुर्गा।
कुणीतरी भेटवा हो माझी देवाई मज आता।।
सांगता न सवरता आई, जाईल कां हो टाकुनी बाळा।
भक्त हांका मारीत असता, देव तरी कोठे का लपला।।
शोध शोधूनी मी ही दमले, कुठे न दिसे तात अन् जननी ।
चरणकमळावरती त्यांच्या देह टाकील मी ओवाळुनी।।
धांव गे आई, पाव रे देवा, पाहूं कुठे मी तुम्हा उभयता।
दर्शन तुमचे झाल्याविना चैन नसे माझ्या चित्ता।।
येरे येरे देवा आतां, संगे घेऊनिया आई।
उभी राहते मी दारी आतां येईल देवाई।।

## देव माझा

कुणीतरी सांगा हो मजला माझा देव कुठे लपला।
शोध शोधूनी मी ही दमले, कुठे दिसे न मला।।
आजीमाजी जीवसृष्टी चराचरी तो भरला।
अणुरेणूतून कणाकणातून सर्वत्र तो पसरला।।
हेची सांगत सर्व ही गेले मी पण त्यांचे ऐकत राहिले।
परि अखेरीस मजला माझ्यातच तो लपला।
हुडकुनी कढीनच मी त्याला, हुडकुनी काढीनच मी त्याला।।

(प्रायोजित)

- ललिता सदानंद तेलंग (ठाणे)

## विवाह /वाङ्निश्चय

| | | |
|---|---|---|
| किशोर शिवानंद बोरकर, जोगेश्वरी | व | गायत्री रमेश गंडभीर, मालाड |
| प्रियेश शांताराम (हेमंत) कुलकर्णी, माहीम | व | स्वप्ना नंदकुमार ठाकुर, दहिसर |
| निशिता सच्चिदानंद कुलकर्णी, सांताक्रुज | व | अर्जुन रविकिरण कर्नाड, लंडन |
| सुदिप्ता सुबोध नाडकर्णी, अमेरिका | व | वदिम किटसिस, अमेरिका |
| श्वेता पूर्णानंद पालेकर, डोंबिवली | व | गौरांग संजीव सिनकर, मुंबई |
| तृप्ती मारुति पिकळे, बोरीवली | व | अक्षय नंदू परब, पारले |
| आनंद योगेन्द्र पिकळे, बोरीवली | व | *राजश्री रवीन्द्र सावंत देसाई, ठाणे |
| तन्वी नितीन वागळे, माहीम | व | आदित्य किरण गायतोंडे, चेंबूर |
| आश्लेषा राजन वागळे, शिवडी | व | हृषीकेश सुंदरराव देसाई, दादर |
| प्राजक्ता दिनेश वागळे, अंधरी | व | संदीप शामसुंदर बजाज, भाईंदर |
| अमेय विजय वाघ, बोरीवली | व | प्रीती गुरुदत्त धारेश्वर, सांताक्रुज |

(* गेल्या अंकातील चुकीच्या नावांची दुरुस्ती)

## विजूले चुटकुले

**घोव बायलेक रागान्** : तुगेल्या मात्यात शेण भरला, शेण.
**बायल** : हंय शेण भरला, म्हण्णच तुमी मगेले माते खायत उरतात

---

**डॉक्टर पेशंटाक** : तुमगेल्या शीकपणाचे कारण किते आसा ते माका लक्षांत येना, माका दिसतां दारु पिल्ल्यान.
**पेशंट** : हरकत ना, तुमगेली उतरनापुढे हांव परत येता.

---

**चली** : आमगेल्या साखरपुडयांत तुवे माका रिंग दिवका, तूं माका तशे प्रॉमिज केल्ले आसा.
**चलो** : हंय गो ! पण तुगेलो फोन नंबर किते?

विजय सदानंद वागळे, ठाणे


Golden Wedding Anniversary
30th May 2014
Arun Bhaskar Kasbekar & Prabha Neelkanth Pikle
1964
1989
2014
With Best Wishes to Papa - Aai & Opa-Oma
for
a healthy and peaceful life from Children and Grand Children




'धूमशान' ALL IS WELL नाटुकलीतील कलाकार

**डावीकडून :** १. उमा वागळे, २. प्रतिमा गायतोंडे ३. मिथिला गायतोंडे ४. मृणाल दळवी ५. स्मिता वाघ ६. सुरेखा पालेकर ७. मंजिरी कुलकर्णी ८. चित्रा कामत



'धुमशान' लावण्यवती

**डावीकडून :** १. वंशिका पिकळे २. अक्षता गायतोंडे ३. निशीता देसाई ४. अपर्णा नाडकर्णी ५. अनुष्का तेलंग ६. रसिका गायतोंडे ७. समिधा गायतोंडे

# SAD DEMISE



## SMT. SUNITI SHANKAR TELANG
## 93,

**D-in-law/o. Late Rao Bahadur**
**G.S. Telang, Karwar.**
**D/o. Late Shri Shantaram Xinai**
**Kinnerkar, Canacona, Goa**

**Passed away**
**peacefully on 28/06/2014**

**Fondly Remembered by**
**Extended Telang,**
**Kinnerkar, Gharse Family**
**and Relatives and Friends**

## निधन

| | | |
|---|---|---|
| संध्या दीपक बोरकर | (कारवार) | कुर्ला |
| कमलाकर रामचंद्र देसाई | (व्हंडक्कल) | कुमटा |
| रमेश भास्कर गंडभीर | (कणसगिरी) | दिंडोशी |
| सुमेधा शांताराम गायतोंडे (पूर्वाश्रमीच्या शालिनी विठ्ठल कुलकर्णी) | (अवर्सा) | मालाड |
| सरिता (शाली) सुरेश गायतोंडे | (किन्नर) | अंधेरी |
| शालन (अनसूया) महारुद्र मिटबंदर | (अंकोला) | कारवार |
| अनंत (आनंद) विठ्ठल कुलकर्णी | (किन्नर) | पुणे |
| सरिता रत्नाकर कुलकर्णी | (हळगे) | वरळी |
| गिरीश श्रीनिवास मुझुमदार | (अंकोला) | कॅनडा |
| यामिनी कमलाकर मुझुमदार | (अंकोला) | विक्रोळी |
| निर्मला श्रीपाद नाडकर्णी | (अंकोला) | पुणे |
| अलका अजित नाडकर्णी | (अंकोला) | पुणे |
| मंगेश नारायण नाडकर्णी | (अंकोला) | पुणे |
| मंगेश (नागेश) वासुदेवराव नाडकर्णी | (अंकोला) | गोरेगांव |
| ललिता विश्वेश्वर नाडकर्णी | (सावरपै) | दादर |
| नंदकुमार विश्वेश्वर नाडकर्णी | (सावरपै) | दादर |
| इंदुमती सदानंद नाडकर्णी | (सावरपै) | खार |
| उल्हास दत्ताराम नाडकर्णी | (सावरपै) | ठाणे |
| शशिकला विठ्ठल नगर्सेकर (पूर्वाश्रमीच्या शशिकला (चमन) महाबळेश्वर (आपा) बोरकर) | (कोडीबाग) | वाशी |
| मुकुंद (महेश) महाबळेश्वर पालेकर | (कडवाड) | प्रभादेवी |
| तेजस्विनी श्रीपाद पिकळे | (अंकोला) | कारवार |
| श्यामकान्त श्रीकृष्ण सबनीस | (कारवार) | अंधेरी |
| रमाबाई (सिन्धू) भास्कर (आरोम) सोहोनी | (गांवगेरी) | दादर |
| रामचंद्र चंद्रहास तेलंग | (नंदव्हाळ) | वांद्रे |
| सुनीती शंकर तेलंग | (बाड) | कारवार |
| सुलभा (सुलु) अवधूत वाघ | (सदाशिवगड) | माहीम |
| सुमन प्रभाकर (छोटू) वागळे | (अस्नोटी) | गोवा |
| कृष्ण (सुनील) गणपत (गंपू) वागळे | (माजाळी) | घाटकोपर |
| नलिनी सुधाकर वर्टी | (सदाशिवगड) | दादर |

# कवळेंमठ संस्कृत पाठांतर स्पर्धा

कैवल्यपूर मठाधीशांच्या आशीर्वादाने यंदाही संघाच्या विद्यमाने संस्कृत पाठांतर स्पर्धा आयोजिण्यात येत आहे. नेहमीप्रमाणे यंदाही स्पर्धकांसाठी दोन गट पाडलेले आहेत. पण शिशु गटातील कुठल्याही स्पर्धकास कुमार गटातही भाग घेण्यास मुभा आहे. प्रत्येक गटासाठी तीन पारितोषिके आहेत. पूर्व तयारी करण्यासाठी स्पर्धकांनी लवकरात लवकर पण ८ सप्टेंबर २०१४ पर्यंत आपली नावे पत्राने अथवा फोनवर (२३८७७३०१) श्रीमती भांडारकर यांच्याकडे नोंदवावी व थेट स्पर्धेच्या ठिकाणी हजर राहावे.

**स्पर्धेची वेळ :** रविवार १४ सप्टेंबर २०१४, संध्याकाळी ४.३०

**स्पर्धेचे स्थळ :** तेंडुलकर मंगल कार्यालय, मोगल लेन, माहीम

**शिशु गट : इयत्ता ४ थी पर्यंत**

**पर्याय क्र. १ :**
**पण्डितेः हि गुणा : सर्वे मूर्खे दोषाश्च केवला:।**
**तस्मान्मूर्ख सहस्रेभ्यः प्राज्ञ एको विशिष्यते।।**
**शतेषु जायते शूरः सहस्रेषु च पण्डितः।**
**वक्ता दशसहस्रेषु दाता भवति वा न वा।।**
**शैले शैले न माणिक्यं मौक्तिकं न गजे गजे।**
**साधवो नहि सर्वत्र चन्दनं न वने वने।।**
**सर्वेऽ पि सुखिन: सन्तु सर्वे सन्तु निरामया:।**
**सर्वे भद्राणि पश्यन्तु न कश्चिद् दु:खमाप्नुयात्।।**

**पर्याय क्र. २ :**
**नरस्याभरणं रूपं, रूपस्याभरणं गुणः।**
**गुणस्याभरणं ज्ञानं ज्ञानस्याभरणं क्षमा।।**
**अन्नदानात्परं दानं विद्यादानमतः परम्।**
**अन्नेन क्षणिका तृप्तिर्यावज्जीवं च विद्यया।।**
**यस्य नास्ति स्वयं पज्ञा शास्त्रं तस्य करोति किम्।**
**लोचनाभ्यां विहीनस्य दर्पणः किं करिष्यति।।**
**सर्वनाशे समुत्पन्ने ह्यर्धं त्यजति पण्डितः।**
**अर्धेन कुरुते कार्यं सर्वनाशो न जायते।।**

कुमार गट : इयत्ता ५ वी ते १० वी पर्यंत

पर्याय क्र. १ : विदेशेषु धनं विद्या व्यसनेषु धनं मतिः।
परलोके धनं धर्मः शीलं सर्वत्र वै धनम्।।
विद्वत्त्वं नृपत्त्वं च नैव तुल्यं कदाचन।
स्वदेशे पूज्यते राजा विद्वान् सर्वत्र पूज्यते।।
विद्या मित्रं प्रवासेसु भार्या मित्रं गृहेषु चे ।
व्याधितस्यौषधं मित्रं धर्मो मित्रमं मृतस्य च ।।
विद्या शस्त्रं च शास्त्रं च द्वे विद्ये प्रतिपत्तये।
आद्या हास्याय वृध्दत्वे द्वितीयाद्रियते सदा।।

पर्याय क्र. २ : अधरं मधुरं वदनं मधुरं नयनं मधुरं हसितं मधुरम्।
हृदयं मधुरं गमनं मधुरं मधुराधिपते रखिलं मधुरम्।।
वचनं मधुरं चरितं मधुरं वसनं मधुरं वलितं मधुरम्।
चलितं मधुरं भ्रमितं मधुरं मधुराधिपते रखिलं मधुरम्।।
गीतं मधुरं पीतं मधुरं भुक्तं मधुरं सुप्तं मधुरम्।
रूपं मधुरं तिलकं मधुरं मधुरंधिपते रखिलं मधुरम्।।
करणं मधुरं तरणं मधुरं हरणं मधुरं स्मरणं मधुरम्।
वमितं मधुरं शमितं मधुरं मधुराधिपते रखिलं मधुरम्।।

संकलन : सौ. विद्या वागळे, माहीम

## श्रध्दांजली

**कै. सावित्रीबाई (कावेरी) नागेश नाडकर्णी (सांवरपै)**

२९ वे पुण्यस्मरण मृत्यु : रविवार २८ जुलै १९८५

तुझ्या प्रेमळ आठवणीशिवाय गेल्या २९ वर्षात एकही दिवस गेला नाही. श्रीमंगेश तुझ्या आत्म्यास शांती देवो. तुझा आशीर्वाद आमच्या पाठीशी अखंड राहो.

तुझ्या स्मृतीस सादर प्रणाम.

**विनय (मोरेश्वर) नागेश नाडकर्णी, पुणे**

# संघास व एज्युकेशन सोसायटीस मिळालेल्या देणग्या

**(मागील अंकानंतर)**

**उल्लेखनीय देणग्या**

## श्रीमती इंदिराबाई व डॉ. कृष्णराव वाघ यांच्या स्मरणार्थ वैद्यकीय निधीसाठी दोन लाख रूपयांची देणगी

कांही गांवीं एखादी व्यक्ती ही केवळ व्यक्ती नसून ती गांवची एक संस्थाच बनते. त्यांचे विशाल कार्यक्षेत्र व अफाट जनसंपर्क यामुळे त्यांना त्या गावांत न ओळखणारे क्वचित. अशा लोकप्रिय व्यक्तींपैकी दोन म्हणजे कारवारचे वामन डॉक्टर व सदाशिवगड (गड) येथील कृष्णडॉक्टर, दोघेही वाघ व दोघेही ख्यातनाम डॉक्टर.

कृष्णडॉक्टरविषयी नमूद करायचे म्हणजे गडावरील भर बाजारांतील त्यांचा दवाखाना हा दवाखाना-कम-नुक्कड होता. हिंदीत सांगायचे म्हणजे दवाखाना 'कम' और नुक्कड 'ज्यादा'. गडावरील प्रतिष्ठित व्यक्ती शुकमास्तर रोज फिरायला जाण्यापूर्वी डॉक्टरांशी दवाखान्यांत दहापंधरा मिनिटे गप्पा मारणार व नंतरच पुढे जाणार. उच्च शिक्षण व नोकरी व्यवसायामुळे बाहेरगांवी गेलेले ग्रामस्थ सुट्टीत गडावर आल्यावर त्यांनी डॉक्टरची भेट (डॉक्टर म्हणून नव्हे, वडीलधारी व्यक्ती म्हणून) घेतलीच पाहिजे असा जणू संकेत होता.

डॉक्टरांचा दवाखाना म्हणजे एक भौगोलिक निशाणी होती. पु.लं.नी सुध्दा 'माझे गाव सदाशिवगड' (पुस्तक 'पुरचुंडी') या एका हृद्य लेखात असा उल्लेख केलेला आहे की, 'सदाशिवगडला मी आणखी एक गोष्ट शिकलो ती म्हणजे सायकल चालवायला. कृष्णडॉक्टरांच्या दवाखान्याजवळचे ते भाड्याने सायकली मिळायचे दुकान आजही माझ्या डोळयापुढे आहे.' म्हणजे पु.लं.च्या नजरेतसुध्दा डॉक्टरांचा दवाखाना म्हणजे एक लॅण्डमार्कच होता.

डॉक्टरांचा जन्म ४ एप्रिल १९०३ चा. बालपण गडावर. पुढे शालेय शिक्षण मुंबईत. त्यांचे मोठे बंधू सीताराम वाघ (सितुअण्णा) हे ए. एफ फर्ग्युसन या ऑडिट फर्ममध्ये कामाला होते. अमृतवाडीत राहायचे. डॉक्टर सितुअण्णाबरोबर राहिले. डॉक्टर जन्मतः सौम्य, मितभाषी, हळु आवाजात बोलणारे. त्यांना मोठयाने बोलताना कुणी ऐकलेच नाही. स्वभाव शांत व मनमिळाऊ असल्यामुळे आपणहून पुढे जाऊन आपल्यापासून होईल तितकी मदत ते करीत असत. देशासाठी व समाजासाठी आपण काहीतरी चांगले करावे असे त्यांना मनापासून वाटत असे. त्यांना वैद्यकीय शिक्षणाची आवड होती. पण मॅट्रीक उत्तीर्ण झाल्यावर त्यांनी आर्टस् कॉलेजमध्ये प्रवेश घेतला कारण त्यावेळी सुध्दा वैद्यकीय शिक्षण सर्वसामान्यांना परवडणारे नव्हते. त्यांचे वडील देखील हयात नव्हते. त्याचवेळी म. गांधीजीनी स्वराज्यासाठी सर्वांनी हातभार लावावा, तरुणांनी वैद्यकीय शिक्षण घ्यावे असा नारा लावला. देशांत खेडयामध्ये अजिबात वैद्यकीय सुविधा नव्हत्या. त्या व्हायला पाहिजेत त्यासाठी तरुणांनी वैद्यकीय शिक्षण घ्यावे असे म्हटले. त्या उद्देशाने गांधीजीनी नॅशनल मेडीकल कॉलेजची (आतांचे टोपीवाला

नायर) स्थापना केली. हे शिक्षण परवडण्यासारखे होते. लगेच त्यांनी तेथे प्रवेश घेतला व डॉक्टरी शिक्षणाची इच्छा पूर्ण केली आणि ते LCPS झाले. शिक्षण पूर्ण झाल्यावर गांवी गडावर जायचेच हे ठरलेले. त्यांनी सरळ तिकडची वाट धरली आणि गांधीजींच्या आदेशानुसार सुरु झाली समाजसेवा. गांवी जाऊन सेवेच्या व्रतातून जे समाधान कमवले ते पुष्कळच होते. त्यावेळी म्हणजे सुमारे १९२५ च्या दरम्यान काळी नदीच्या उत्तर पंचक्रोशीत ते एकमेव डॉक्टर होते. गोव्याच्या सीमेपलीकडील पैंगिणी, लोलये, काणकोण इथूनही त्यांच्याकडे रुग्ण यायचे. डॉक्टरही तेथे तपासणीला जायचे. त्यांच्या सोयीसाठी त्यांनी माजाळीला पण संध्याकाळचा दवाखाना सुरु केला.

गरीबाबद्दल त्यांना अति कणव. त्यांच्याकडून औषधाचे मूल्यही ते घेत नसत. उपाशी पोटी (कधी रुग्णाच्या घरी अन्नही नसायचे) औषध घेता येत नाही म्हणून मग त्यांना आपल्या घरी पाठवायचे. तेथे त्यांच्या पत्नी म्हणजे इंदिराकाकी समजायच्या. त्यांना पेज, लोणचे, भाजी भात कधी ताक जे काही तयार असेल ते द्यायच्या. ते खाऊन मगच त्या रुग्णाला औषध घेता येत असे.

म्हणतात की प्रत्येक यशस्वी पुरुषामागे एक स्त्री असते. त्याप्रमाणे डॉक्टरांच्या मागे त्यांच्या पत्नी होत्या. त्या गडावर इंदिराबाई किंवा काकी म्हणून ओळखल्या जायच्या. अशा ह्या दोन कनवाळू माणसांचा विवाह गडावर २१ मे १९२८ रोजी झाला. पूर्वीच्या कु. शांती अनंत देसाई (जन्म १९१०) ह्या सौ. इंदिरा कृष्णराव वाघ झाल्या. त्यांचे वडील पण सातार्‍याला डॉक्टर होते पण प्लेगमध्ये वारले.

आपल्या संघाचे उपाध्यक्ष श्री. मारुति दळवी यांच्या बालपणीच्या आठवणीनुसार त्यांचे वडील हळगे येथे शाळामास्तर होते. तेथे त्यांना टायफॉइड झाला. त्यावेळी डॉक्टर दिवसाआड दहा किलोमीटरचा खडबडीत धुळीचा रस्ता सायकलवरुन ओलांडून दळवीमास्तरांच्या उपचारासाठी जात असत. सतत एक महिना. त्यासाठी त्यांनी एक दिडकीची फी आकारली नाही. सध्याच्या कट प्रॅक्टीसच्या जमान्यात अशा घटना सिनेमा नाटकातल्या सारख्या काल्पनिक वाटतात.

प्रभू रामचंद्र व वीर हनुमान यांची जोडी जशी अभेद्य त्याचप्रमाणे कृष्णडॉक्टर व त्यांचे कंपाऊंडर काशण्णा (रघुनाथ) वाघ यांची जोडी अभेद्य होती. डॉक्टरांच्या कृपाळू स्वभावाचा फायदा घेऊन काही सधन पैसे द्यायची टाळाटाळ करीत. मग काशण्णा वसुलीला जात. हात हलवत परत आल्यावर डॉक्टर विचारायचे तर काशण्णा सांगायचे 'दिता म्हण्ण सांगला?' डॉक्टर म्हणायचे, 'कित रे? दर्गॉ?' कधी कधी काशण्णा म्हणायचे 'करता म्हण्ण सांगला' डॉक्टर म्हणायचे 'कित रे? घात?' त्यांच्यातले हे संवाद दवाखान्यात बसलेले ऐकायचे. कालांतराने ही टिपणी एक स्थानिक वाक्‌प्रचार होऊन राहिली.

डॉक्टरनीं स्वांतत्र्यलढयात सक्रीय भाग घेतलेला नसला तरी स्वातंत्र्यसैनिकांना बरीच

मदत केली. रात्री बेरात्री भूमिगत झालेले स्वातंत्र्यसेवक घरी यायचे. त्यांच्या खाण्यापिण्याची व राहण्याची व्यवस्था करण्यांत व प्रचार कार्यात ते मदत करीत असत. सौ. काकी रात्री उठून त्यांच्यासाठी जेवण न्याहारी वगैरे बनवीत इतकेच नव्हे तर काहीना फक्त बकरीचेच दूध लागायचे, काहींना फक्त हातसडीचेच तांदूळ लागायचे, त्यांची पण ते व्यवस्था करायचे. अधूनमधून गांवच्या पुढाऱ्यांच्या भेटीगाठी घालून द्यायचे हे सर्व करतांना जातीपातीचा भेद नव्हता किंवा त्यांच्यासाठी त्या काळानुसार त्यांनी वेगळी भांडीकुंडी ठेवली नाहीत.

१८९५ साली कै. शंकर नाडकर्णी (शुकमास्तर) यांनी गडावर एक माध्यमिक शाळा सुरु केली, सध्याचे सदाशिवगड हायस्कूल. नंतर उतारवयात त्यांना शाळेचे काम सोसेनासे झाले. तेव्हा त्यांनी सर्व कर्त्या व्यक्तींना एकत्र आणून सदाशिवगड एज्युकेशन सोसायटी ही संस्था स्थापना केली व शाळेची सर्व सूत्रे संस्थेकडे सोपविली. शुकमास्तरांच्याच इच्छेनुसार डॉक्टरांनी हया संस्थेचे अध्यक्ष म्हणून अनेक वर्षे काम सांभाळले व शाळेची धुरा वाहिली. आपल्या एज्युकेशन सोसायटीच्या सदाशिवगड स्थानिक समितीचे अध्यक्ष म्हणूनही त्यांनी बरीच वर्षे काम केले. २६ मे १९७३ रोजी भरलेल्या वार्षिक सर्वसाधारण सभेत सोसायटीनें त्यांना सन्माननीय सभासद म्हणून स्वीकृत करुन घेतले.

अशा या कर्तबगार, लोकप्रिय व्यक्तीचे मे १९८९ मध्ये पुणे येथे दु:खद निधन झाले. त्यांच्या प्रत्येक कामांत उत्स्फूर्तपणे साथ देणाऱ्या इंदिराबाईचे मे १९८४ साली पुण्यांतच देहावसान झाले. अलीकडे मे महिन्यात त्यांच्या सुविद्य कन्या सौ. अनुपमा (कुंदा) व्यंकटराय कामथ यांनी त्यांच्या आईवडिलांच्या स्मृतीप्रीत्यर्थ डॉक्टरांच्याच व्यवसायाशी निगडीत अशा संघाच्या वैद्यकीय निधीसाठी दोन लाख रुपयांची देणगी दिलेली आहे.

## श्री अरुण कसबेकर यांच्यातर्फे तीन लाखाहून अधिक रकमेची आणखी एक देणगी

आपल्या ज्ञातीचे एक निस्सीम हितचिंतक श्री. अरुण भास्कर कसबेकर हे आपल्या संघाला विविधप्रसंगी भरघोस देणग्या देत असल्यामुळे ते आता सर्वांच्या परिचयाचे झाले आहेत. अलीकडेच ३० मे रोजी श्री. अरुण व सौ. मंगला (पूर्वाश्रमीच्या प्रभा नीलकंठ पिकळे) यांच्या विवाहाला पन्नास वर्षे पूर्ण झाली. या सुवर्णमहोत्सवी वर्षाच्या शुभप्रसंगी उभयतांनी संघाच्या वृध्द सेवानिधीसाठी ३,११,१११ रुपयांची देणगी दिलेली आहे. नितांत श्रध्दा असलेली त्यांची कुलदेवता श्रीशांतादुर्गा हिच्या चरणी भक्तीभावाने अर्पण म्हणून त्यातील रु. १,११,१११ आहेत. तसेच सौ. मंगला यांचे आईवडील श्रीमती शांताबाई व श्री. नीलकंठ पांडुरंग पिकळे यांच्या स्मृती प्रीत्यर्थ प्रत्येकी एक लाख रुपये दिलेले आहेत.

श्री कसबेकर यांनी संघाला आतापर्यंत सोळा प्रसंगी देणग्या दिलेल्या आहेत व त्या सर्व देणग्यांची एकूण रक्कम ३० लाखाहून अधिक आहे.

विवाहाच्या सुवर्णमहोत्सवी वर्ष दिनाच्या निमित्त संघातर्फे उभयतांचे अभीष्टचिंतन.

## श्री सुरेश गायतोंडे यांच्या स्मृतीप्रीत्यर्थ अमृत महोत्सव निधीसाठी दोन लाख रुपयांची देणगी

श्री. सुरेश विष्णु गायतोंडे हे मागे आपल्या संघाच्या कार्यकारिणीचे सक्रिय सभासद होते. हसतमुख चेहरा, प्रसन्न व्यक्तिमत्व, अजातशत्रू म्हणून ते सहकाऱ्यांमध्ये लोकप्रिय होते. २००७ साली त्यांचे दु:खद निधन झाले. त्यांच्या पत्नी श्रीमती सरिता (शाली) याचेही अलीकडेच निधन झाले. श्री गायतोंडे यांच्या स्मृतीप्रीत्यर्थ त्यांच्याच इच्छेनुसार त्यांचे बंधू श्री. दुर्गादास गायतोंडे यांनी अलीकडेच संघाच्या अमृत महोत्सव निधीसाठी दोन लाख रुपयांची देणगी दिलेली आहे.

## सौ. निर्मला व श्री. प्रमोद वर्टी यांच्यातर्फे वृध्दसेवानिधीसाठी एक लाख रुपयांची देणगी

आदर्शनगर, प्रभादेवी, येथे राहणारे सौ. निर्मला व श्री. प्रमोद वामन वर्टी यांनी अलीकडेच वृध्दासेवानिधीसाठी एक लाख रुपयांची देणगी दिलेली आहे. त्यातील पन्नास हजार रुपये श्री. प्रमोद वर्टी यांच्यातर्फे आईवडील श्रीमती लक्ष्मीबाई व डॉ. वामन अंबाजी वर्टी यांच्या स्मृतीप्रीत्यर्थ आहेत व ऊर्वरित पन्नास हजार रुपये श्रीमती निर्मला यांच्यातर्फे आईवडील श्रीमती सावित्री व श्री. दत्तात्रय (दत्तोबा) सर्वोत्तम नाडकर्णी (मल्लापूर) यांच्या स्मृती प्रीत्यर्थ आहेत.

## श्रीमती सरिता कुलकर्णी यांच्या स्मृतीप्रीत्यर्थ एज्युकेशन सोसायटीला एक लाख रुपयांची देणगी

गेल्या पिढीतील आपल्या ज्ञातीचे एक आधारस्तंभ व आपल्या बँकेचे संस्थापक श्री. शांताराम मंगेश कुलकर्णी (शेठ शांताराम) यांचे प्रभादेवी येथे राहणारे नातू श्री. रत्नाकर जयवंत कुलकर्णी यांच्या पत्नी श्रीमती सरिता यांचे नुकतेच मे महिन्यांत दु:खद निधन झाले. दिवंगत श्रीमती सरिता यांच्या स्मृतीप्रीत्यर्थ पती श्री. रत्नाकर, पुत्र श्री जयदीप व कन्या श्रीमती स्नेहा प्रभू यांनी एज्युकेशन सोसायटीला एक लाख रुपयांची देणगी दिलेली आहे.

## श्री गिरीश शानभागतर्फे एक लाख रुपयांची देणगी

कॅनडास्थित श्री. गिरीश शानभाग यांचे वडील श्री. महाबळेश्वर दामोदर शानभाग हे सचिवालयांतून डे. सेक्रेटरी (फायनान्स) या पदावरुन निवृत्त झालेले आहेत. १ मार्च रोजी त्यांना ९५ वर्षे पूर्ण झाली. त्या प्रसंगी गिरीश यांनी एक लाख रुपयांची देणगी दिलेली आहे. त्यातले तीस हजार रुपये वडिलांच्या नांवे वृध्दसेवानिधीसाठी आहेत, चाळीस हजार रुपये दिवंगत आई श्रीमती नलिनी शानभाग यांच्या स्मरणार्थ समाजसेवा निधीसाठी आहेत व ऊर्वरित तीस हजार रुपये आईवडिलांच्या नांवे वैद्यकीय सेवानिधीसाठी आहेत.

## श्रीमती गीता सबनीस यांच्या स्मृतीप्रीत्यर्थ एक लाख दोन रुपयांची देणगी

मागे सुरत येथे वास्तव्याला असलेले श्रीमती प्रमिला व कै. श्री. विश्वेश्वर शांताराम कसबेकर यांची कन्या व श्री. हर्षद शांताराम सबनीस यांची पत्नी गीता ऊर्फ शीला यांचे मार्च महिन्यात निधन झाले. त्यांच्या स्मरणार्थ अलीकडेच एक लाख व दोन रुपयांची देणगी मिळालेली आहे. त्यातील रु. ५०,००१ पती श्री. हर्षद, पुत्र श्री. शांतेश व कन्या श्रीमती डॉ. नीलाक्षी सबनीस अयप्पन यांच्यातर्फे समाजसेवानिधीसाठी आहेत व ऊर्वरित रु. ५०,००१ आई श्रीमती प्रमिला व बंधू श्री अजित कसबेकर यांच्यातर्फे एज्युकेशन सोसायटीसाठी आहेत.

## श्री वासुदेव कुलकर्णी यांच्या इच्छेनुसार आणखी पन्नास हजार रुपयांची देणगी

माहीम येथे राहणारे श्री. वासुदेव नारायण कुलकर्णी कारवारकरांच्या संबंधित संस्थांमध्ये विशेष रस घेत असत. त्यांनी संघाला मागे दोन वेळा एकेक लाख रुपयांच्या देणग्या दिल्या होत्या. त्यांचे जानेवारी २०१३ मध्ये निधन झाले. तेव्हा त्यांच्या इच्छेनुसार त्यांच्या हितचिंतकानी श्री कुलकर्णी यांच्या स्मृतीप्रीत्यर्थ वृध्दसेवानिधीसाठी पन्नास हजार रुपयांची देणगी दिली होती. त्यांनी आता परत आणखी पन्नास हजार रुपयांची देणगी दिलेली आहे.

## श्री. सदाशिव नाडकर्णी यांच्या जन्मशताब्दीप्रसंगी पन्नास हजार रुपयांची देणगी

मूळ अंकोला येथील श्री. सदाशिव रामचंद्र नाडकर्णी हे धारवाड येथे स्थायिक झाले होते. ते नाडकर्णी मास्तर म्हणून सर्वांना परिचित होते. त्यांचे २००८ साली निधन झाले व त्यांच्या पत्नी उमाबाई (प्रेमा) यांचे २०११ साली निधन झाले. ६ मे २०१४ रोजी नाडकर्णी मास्तरांची जन्मशताब्दी. त्या प्रसंगी त्यांच्या सुविद्य कन्या श्रीमती सुहासिनी गिंडे व सुचेता हवालदार यांनी आईवडिलांच्या स्मृतीप्रीत्यर्थ पन्नास हजार रुपयांची देणगी दिलेली आहे. त्यातील रु. २५,००० संघाच्या वृध्द सेवानिधीसाठी आहेत व ऊर्वरित रु. २५,००० एज्युकेशन सोसायटीसाठी आहेत.

## श्री. श्रीकांत वागळे यांजकडून पन्नास हजार रुपयांची देणगी

हिन्दू कॉलनी, दादर येथे राहणारे श्री. श्रीकांत विश्वनाथ वागळे यांनी आपल्या एज्युकेशन सोसायटीला पन्नास हजार रुपयांची देणगी दिलेली आहे. त्यांतील रु. २५,००० बंधू श्री. शंकर यांच्या स्मृतीप्रीत्यर्थ दरवर्षी बी. एस्.सी परीक्षेत केमिस्ट्री विषयात प्रथम येणाऱ्यास बक्षीस देण्यासाठी आहेत. तसेच ऊर्वरित रु. २५,००० भावजय श्रीमती शोभा शंकर वागळे यांच्या स्मृतीप्रीत्यर्थ दरवर्षी शालान्त परीक्षेत मराठी विषयांत सर्वाधिक गुण मिळविणाऱ्यास बक्षीस देण्यासाठी आहेत.

## श्रीमती सुषमा मुळगांवकर यांच्यातर्फे एक लाख रुपयांची देणगी

मुलुंड येथे राहणाऱ्या श्रीमती सुषमा मुळगांवकर म्हणजे पूर्वाश्रमीच्या कु. वासंती प्रभाकर तेलंग, सुप्रसिध्द बीनकार सतार मंगेशमाम यांची पणती. त्यांचे पती श्री. सुबोध मुळगांवकर यांचे गेल्या वर्षी अकस्मात निधन झाले. त्यांच्या प्रथम पुण्यतिथीच्या प्रसंगी त्यांच्या स्मरणार्थ श्रीमती सुषमा यांनी संघाच्या समाजसेवानिधीसाठी एक लाख रुपयांची देणगी दिलेली आहे.

## 'हारवाडा' या गावाच्या नांवाची व्युत्पत्ती

आपल्यापैकी कांही तेलंग व वाघ हे कुटुंबीय मूळचे 'हारवाडा' या गांवचे. हारवाडा हे गांव अवर्सा बस स्टँडपासून पश्चिमेला तीन किलोमीटर अंतरावर आहे. कोकण रेल्वेच्या मार्गावर कारवार नंतरच्या स्थानकाचे नांव हारवाडा हे आहे. तेथे पूर्वी हरीहर या नांवाचा सरदार राज्य करीत होता. त्याच्या वाड्याचे अवशेष मी लहानपणी पाहिलेले आहेत. आता ती जागा कुळांच्या नांवावर झालेली आहेत. हरीहर यांचा वाडा यावरूनच हारवाडा हे नांव प्राप्त झालेले आहे.

**रमेश गणपती कुलकर्णी (अवर्सा), पारले**
**(२८२२३४३०)**


# Shailesh Gaitonde
**Account Consultancy**

Office : S/70, Goyal Trade Centre, Shantivan, Borivali (E), Mumbai 400066.
**Tel.:** (Off.) 022-28974402 (Mob.) 98692 11055 • **Office Time :** 10.00 a.m. to 6.00 p.m.

**COMPUTERISED ACCOUNTS SERVICES**

- **FOR COMPANIES & PRIVATE FIRMS UPTO FINALISATION**
- **FOR CO-OP HSG SOCIETIES**
  - *Monthly / Quarterly Billing & Receipts of the Society*
  - *Accounts Books are maintained on Computer*
  - *Monthly or Annual Report*
  - *Statutory Audit from Panel Auditor*
  - *Finalization of Accounts*
  - *Administration of Society*
- **For Filling of Income Tax Returns & PAN Number**
- **For Personalized & Home Service**
- **(VACANCY FOR SOCIETY MANAGER, INTERESTED AND EXPERIENCED CANDIDATE PLEASE CONTACT)**

## संघास मिळालेल्या देणग्या

| | | |
|---|---|---|
| १. | श्रीमती सुनंदा व श्री गोपीनाथ शिवराव वाघ, श्रीमती गोदावरी, श्री. रामकृष्ण शिवराव वाघ, श्रीमती स्नेहलता यांच्या स्मरणार्थ श्रीमती सुनंदा व श्री. गोपीनाथ शिवराव वाघ यांच्या मुलांकडून | २५०० |
| २. | श्रीमती रमाबाई व श्री. भिकप्पा विनायक तेलंग व श्रीमती शकुंतला व व श्री त्रिंबक महाबळेश्वर तेलंग यांच्या स्मरणार्थ श्रीमती रमाबाई व श्री. भिकप्पा विनायक तेलंग यांच्या नातवंडाकडून | २००० |
| ३. | श्रीमती सुनंदा व श्री. गोपीनाथ शिवराव वाघ, श्री. रामकृष्ण शिवराव वाघ, श्रीमती गोदावरी शिवराव वाघ व श्रीमती स्नेहलता गोपीनाथ वाघ यांच्या स्मरणार्थ सर्वश्री अविनाश व सुधीर रामकृष्ण वाघ यांजकडून | २५०० |
| ४. | श्रीमती गीता हर्षद सबनीस यांच्या स्मरणार्थ पती श्री. हर्षद शांताराम सबनीस, पुत्र श्री. शांतेश व कन्या श्रीमती नीलाक्षी सबनीस अयप्पन यांजकडून | ५०,००१ |
| ५. | श्री. रमाकांत कृष्णराव वागळे यांच्या स्मरणार्थ पुत्र श्री. मिलिंद यांजकडून | १०,००१ |
| ६. | श्रीमती शांताबाई रमाकांत बोरकर यांच्या ५ व्या पुण्यतिथीनिमित्त त्यांच्या मुलांकडून | १,००१ |
| ७. | श्री. मधुकर सांबाराव तेलंग यांच्या जन्मशताब्दी प्रसंगी त्यांच्या गोड आठवणींच्या स्मरणार्थ त्यांच्या मुलांकडून | १,००० |
| ८. | श्री. सच्चिदानंद नागेश नाडकर्णी यांच्या १८ व्या पुण्यतिथीनिमित्त नाती कुमारी सुदिप्ता व अनुष्का सुबोध नाडकर्णी यांजकडून | ५,००० |
| ९. | श्री. शिवानंद बाळकृष्ण पालेकर यांच्या पुण्यतिथीनिमित्त पुत्र श्री. विठ्ठल (बाळ) पालेकर व स्नुषा श्रीमती लता पालेकर यांजकडून. | १०,००० |
| १०. | श्री. मधुकर महेश्वर मुझुमदार यांच्या पुण्यतिथीनिमित्त कन्या श्रीमती लता विठ्ठल पालेकर यांजकडून | १०,००० |
| ११. | श्री. माधव वेंकटराव दिवेकर यांच्या पुण्यतिथी निमित्त पत्नी श्रीमती मालती यांजकडून | ५,००० |
| १२. | श्री. सुबोध मंगेश मुळगांवकर यांच्या स्मरणार्थ त्यांच्या प्रथम पुण्यतिथीप्रसंगी पत्नी श्रीमती सुषमा यांजकडून | १,००,००० |
| १३. | श्री. वसंत शांताराम गायतोंडे यांच्या १६ व्या पुण्यतिथीनिमित्त बंधू श्री. वासुदेव शांताराम गायतोंडे यांजकडून | ६,००० |

| | | |
|---|---|---|
| १४. | श्रीमती नलिनी महाबळेश्वर शानभाग यांच्या स्मरणार्थ पुत्र श्री. गिरीश यांजकडून | ४०,००० |
| १५. | श्री. देवीदास पांडुरंग बोरकर यांच्या वाढदिवसाच्या प्रसंगी त्यांच्या स्मरणार्थ पत्नी श्रीमती शैलजा व कन्या कु. सुनीता दे. बोरकर यांजकडून | ५,००० |
| १६. | श्री. घनश्याम गोपाल वर्टी यांच्या ८२ व्या वाढदिवसाच्या प्रसंगी त्यांच्या स्मरणार्थ कन्या श्रीमती सीमा अजय शेंबेकर यांजकडून | १,००१ |

## वैद्यकीय साहाय्याप्रीत्यर्थ

| | | |
|---|---|---|
| १. | श्री. गोविंद मारुती कसबेकर यांच्या ३ऱ्या पुण्यतिथी निमित्त पुत्र श्री. विनय याजकडून | ३,००० |
| २. | श्रीमती इंदिराबाई व डॉ. कृष्णराव गणपतराव वाघ यांच्या स्मरणार्थ कन्या श्रीमती अनुपमा (कुंदा) व्यंकटराय कामथ याजकडून | २,००,००० |
| ३. | श्रीमती प्रमिला व श्री. शामराव मंगेश पिंगे यांच्या पुण्यतिथीनिमित्त पुत्र श्री. मंगेश यांजकडून | ३,००१ |
| ४. | श्री. महाबळेश्वर दामोदर शानभाग व श्रीमती नलिनी महाबळेश्वर शानभाग यांच्या नांवे पुत्र श्री. गिरीश यांजकडून | ३०,००० |

## वृध्दसेवा निधीसाठी

| | | |
|---|---|---|
| १. | श्रीमती विनता विश्वंभर गायतोंडे यांच्या १३ व्या पुण्यतिथी निमित्त बंधू श्री. अरुणकुमार विश्वंभर गायतोंडे यांजकडून | १०,००० |
| २. | श्रीमती उमाबाई (प्रेमा) व श्री. सदाशिव रामचंद्र नाडकर्णी यांच्या स्मरणार्थ श्री. सदाशिव नाडकर्णी यांच्या जन्मशताब्दी प्रसंगी कन्या श्रीमती सुहासिनी गिंडे व सुचेता हवालदार यांजकडून | २५,००० |
| ३. | श्री. रघुनाथ महादेव गंडभीर यांच्या जन्मशताब्दी प्रसंगी पुत्र डॉ. अजित यांजकडून | २०,००० |
| ४. | आईवडील श्रीमती लक्ष्मीबाई व डॉ. वामन अंबाजी वर्टी यांच्या स्मरणार्थ श्री. प्रमोद वामन वर्टी यांजकडून | ५०,००० |
| ५. | आईवडील श्रीमती सावित्री व श्री. दत्तात्रय (दत्तोबा) सर्वोत्तम नाडकर्णी (मल्लापूर) यांच्या स्मरणार्थ श्रीमती निर्मला प्रमोद वर्टी यांजकडून | ५०,००० |
| ६. | श्री. वासुदेव नारायण कुलकर्णी यांच्या इच्छेनुसार हितचिंतकाकडून | ५०,००० |

| | | |
|---|---|---|
| ७. | श्री. मधुकर वेंकटराव नाडकर्णी यांच्या स्मरणार्थ त्यांच्या वाढदिवसाच्या प्रसंगी पत्नी श्रीमती माधुरी यांजकडून | २,००० |
| ८. | श्री. महाबळेश्वर दामोदर शानभाग यांच्या ९५ व्या वाढदिवसानिमित्त पुत्र श्री. गिरीश याजकडून | ३०,००० |
| ९. | श्री. दिगंबर घनश्याम वागळे यांच्या स्मरणार्थ बहीण श्रीमती इंदू कमलाकर नाडकर्णी यांजकडून | १०,००० |
| १०. | सौ. मंगला (प्रभा) व श्री अरुण भास्कर कसबेकर यांच्यातर्फे विवाहाच्या सुवर्णमहोत्सवी वर्षाच्या प्रसंगी | |
| | १) श्री. शांतादुर्गेच्या चरणी भक्तिभावाने अर्पण | १,११,१११ |
| | २) सौ. मंगला यांचे वडील श्री. नीलकंठ पांडुरंग पिकळे यांच्या स्मृतीप्रीत्यर्थ | १,००,००० |
| | ३) सौ. मंगला यांची आई श्रीमती शांताबाई नी. पिकळे यांच्या स्मृतीप्रीत्यर्थ | १,००,००० |
| ११. | श्रीमती शांता (माई) व श्री. मंगेश (भाऊ) महेश्वर नेत्रावळी यांच्या विवाहदिनाच्या प्रसंगी त्यांच्या स्मरणार्थ कन्या श्रीमती शुभदा (गीता) रमेश वागळे यांजकडून | ८,००० |

## अमृत महोत्सव निधीसाठी

| | | |
|---|---|---|
| १. | श्री. सुरेश विष्णु गायतोंडे यांच्या स्मरणार्थ बंधू श्री. दुर्गादास यांजकडून | २,००,००० |

## एज्युकेशन सोसायटीस मिळालेल्या देणग्या

| | | |
|---|---|---|
| १. | श्री. शंकर विश्वनाथ वागळे यांच्या स्मरणार्थ बंधू श्री. श्रीकांत विश्वनाथ वागळे यांजकडून बी.एस्सी केमिस्ट्री विषयात प्रथम येणाऱ्या विद्यार्थ्यांस बक्षीस देण्यासाठी | २५,००० |
| २. | श्रीमती शोभा शंकर वागळे यांच्या स्मरणार्थ दीर श्री. श्रीकांत विश्वनाथ वागळे यांजकडून एसएस्सीत मराठी विषयात प्रथम येणाऱ्या विद्यार्थ्यांस बक्षीस देण्यासाठी | २५,००० |
| ३. | श्रीमती गीता हर्षद सबनीस यांच्या स्मरणार्थ आई श्रीमती प्रमिला विश्वेश्वर कसबेकर व बंधू श्री. अजित विश्वेश्वर कसबेकर यांजकडून | ५०,००१ |
| ४. | कुमारी दिव्या दामोदर शानभाग यांजकडून | ५,००० |

| | | |
|---|---|---|
| ५. | श्रीमती शांताबाई रमाकांत बोरकर यांच्या ५ व्या पुण्यतिथीनिमित्त त्यांच्या मुलांकडून | १,००१ |
| ६. | श्री. मंदार पुंडलीक वाघ यांजकडून | ५०,००० |
| ७. | श्री. माधव महेश्वर वागळे यांच्या स्मरणार्थ कन्या श्रीमती सुशांता तेलंग यांजकडून | ४०,००० |
| ८. | श्रीमती उमाबाई (प्रेमा) व श्री. सदाशिव रामचंद्र नाडकर्णी यांच्या स्मरणार्थ श्री. सदाशिव नाडकर्णी यांच्या जन्मशताब्दी प्रसंगी कन्या श्रीमती सुहासिनी गिंडे व सुचेता हवालदार यांजकडून | २५,००० |
| ९. | श्रीमती ललिता माधव वागळे यांच्या १७ व्या पुण्यतिथीनिमित बंधू श्री. अरुणकुमार विश्वंभर गायतोंडे यांजकडून | १०,००० |
| १०. | श्री. मोहन मंगेश वाघ यांच्या ८० व्या वाढदिवसाच्या प्रसंगी त्यांच्या स्मरणार्थ पत्नी श्रीमती मेहेरु व कन्या श्रीमती मनीषा मोहन वाघ यांजकडून | ११,००० |
| ११. | श्री. मधुकर सांबाराव तेलंग यांच्या जन्मशताब्दी प्रसंगी त्यांच्या स्मरणार्थ मुलांकडून | १,००० |
| १२. | श्रीमती निर्मला मंगेश केरकर यांच्या ७५ व्या वाढदिवसाच्या प्रसंगी कन्या ज्योती व पुत्र शैलेश यांजकडून | १०,००० |
| १३. | दिवंगत श्रीमती सरिता रत्नाकर कुलकर्णी यांच्या स्मृतीप्रीत्यर्थ पती श्री. रत्नाकर जयवंत कुलकर्णी, कन्या श्रीमती स्नेहा प्रभू व पुत्र श्री. जयदीप कुलकर्णी यांजकडून | १,००,००० |
| १४. | श्री. माधव दत्तात्रय वर्टी यांच्या ६ व्या पुण्यतिथीनिमित्त पत्नी श्रीमती माधुरी यांजकडून | १,००१ |
| १५. | श्रीमती कमल विश्वंभर गायतोंडे यांच्या ८ व्या पुण्यतिथीनिमित्त बंधू श्री. अरुणकुमार विश्वंभर गायतोंडे यांजकडून | १०,००० |
| १६. | श्री. घनश्याम गोपाल वर्टी यांच्या ८२ व्या वाढदिवसाच्या प्रसंगी त्यांच्या स्मरणार्थ श्रीमी सीमा अजय शेंबेकर यांजकडून | १,००० |

## ठाणे मंच देणगीदारांची यादी

| | | | |
|---|---|---|---|
| १. | श्री. सत्यनारायण (शशांक)बाळिगा | | २,१०१ |
| २. | श्री. प्रकाश महारुद्र वाघ, | मुलुंड | २,००१ |
| ३. | श्री. रवीन्द्र नारायण बोरकर, | गोवा | २,००० |
| ४. | श्री. गौरीकुमार सीताराम कुलकर्णी | दादर | २,००० |
| ५. | श्री. गिरीश मुरलीधर रेगे | नाशिक | १,५०० |

Regd. with Registrar of Newspapers of India under Reg. No. RN37436/80




हे पत्र संपादक, मुद्रक, प्रकाशक द. ना. नाडकर्णी यांनी
दि नॉ. कॅ. गौ. सा. ब्रा. संघ, मुंबई ४, यांच्यासाठी प्रसिद्ध केले.